प्रेस नोट

दि. 19/08/2019

माध्यमांसोबत 'स्मार्ट' संवाद

नाशिक- नाशिक म्युनिसीपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणजेच नाशिक स्मार्ट सिटीच्या वतीने नाशिकमधील दैनिकांचे संपादक, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे ब्युरो चीफ आणि माध्यम प्रतिनिधींसोबत 'संवाद संपादकांसोबत' हा कार्यक्रम दिनांक 19/08/2019 रोजी आयोजित करण्यात आला होता. यावेळी नाशिक म्युनिसीपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री प्रकाश थविल यांनी नाशिक स्मार्ट सिटीची पार्श्वभूमी, माहिती आणि महत्त्व माध्यम प्रतिनिधींना समजावून सांगितले. त्याचबरोबर जनरल मॅनेजर सिव्हील मा. श्री विश्राम पाटील यांनीही स्मार्ट सिटीच्या काही प्रकल्पांची माहिती विषद केली. भारतात सुरू असलेल्या 100 स्मार्ट सिटींमध्ये नाशिक म्युनिसीपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड 23 व्या आणि राज्यात तिसऱ्या स्थानी आहे.

लोकनेते पंडितराव खैरे पंचवटी विभागीय कार्यालय येथील नाशिक म्युनिसीपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडच्या कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. स्मार्ट सिटीची स्थापना झाल्यापासून ते स्मार्ट सिटी अस्तित्वात आल्यानंतर आतापर्यंत आणि यापुढे स्मार्ट सिटी अंतर्गत होणाऱ्या सर्व प्रकल्पांची माहिती माध्यमांना देण्यात आली. त्याचबरोबर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रकाश थविल यांनी स्मार्ट सिटी संदर्भात सुरू असलेल्या कामांबाबत सविस्तर माहिती दिली आणि यावेळी उपस्थित माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी मनमोकळी उत्तरे दिली. नाशिककरांपर्यंत माध्यमांच्या माध्यमातून स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांची माहिती पोहोचावी. तसेच स्मार्ट सिटी हा प्रकल्प नाशिककरांसाठी आणि नाशिककरांचाच आहे, त्या अनुषंगाने नाशिककरांनीही या प्रकल्पामध्ये सक्रीय सहभागी व्हावे हा या बैठकीमागील उद्देश होता.

नाशिक म्युनिसीपल स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड अंतर्गत शहरामध्ये 51 प्रकल्प होणार आहेत. त्यापैकी 21 प्रकल्प पूर्ण झाले आहेत, 11 प्रकल्पांवर काम सुरू आहे, 15 प्रकल्प टेंडर प्रक्रियेत आहेत आणि 5 प्रकल्प डीपीआर प्रक्रियेत आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत पूर्ण झालेल्या 21 प्रकल्पांची माहिती यावेळी माध्यमांना देण्यात आली. त्यात कालिदास कलामंदिराचे नुतनिकरण, महात्मा फुले कलादालनाचे नुतनिकरण, नेहरू उद्यानाचे नुतनिकरण, पब्लिक बायसिकल शेअरिंग, ट्राफीक पार्क, नेहरू बायोडायव्हर्सिटी प्रकल्प, होळकर पुलावर करण्यात आलेले रंगित कारंजे, इतिहास संग्रहालय, घनकचरा व्यवस्थापन, महामार्ग क्रमांक-3 वरील पुलाखालील सौंदर्यिकरण, सरकारवाडा नुतनीकरण, विद्युत शवदाहिनी, या प्रकल्पांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. प्रकाश थविल यांनी माहिती दिली आणि पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरेही दिली. त्याचबरोबर स्मार्ट पार्किंग, स्मार्ट रोड, सौर ऊर्जा प्रकल्प, गोदा सौंदर्यिकरण प्रकल्प, इंटीग्रेटेड कंट्रोल अँड कमांड सेंटर, एरिया बेस्ड डेव्हलपमेंट, स्काडा प्रकल्प, स्मार्ट स्ट्रीट लाईट्स, ग्रीन फिल्ड डेव्हलपमेंट आणि टाऊन प्लानिंग स्कीम तसेच स्कील डेव्हलपमेंट या संदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.

प्रोजेक्ट गोदा अंतर्गत होत असलेल्या गोदा सौंदर्यिकरण करण्यात येणार असल्याचे यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रकाश थविल यांनी सांगितले. पुररेषेचा विचार करता या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आल्याचं मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रकाश थविल यांनी सांगितलं. प्रोजेक्ट गोदासाठी 55.05 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामध्ये गोदावरी डी सिल्टींग म्हणजेच नदीतील गाळ काढणे, गाळ काढल्यामुळे पूर परिस्थितीत मोठ्या प्रमाणात जे पाणी नदीपात्राबाहेर येते ते येणार नाही. विशेष म्हणजे होळकर पुलाखाली ऑटोमेटेड मॅकेनिकल गेट बसवण्यात येणार आहे, त्यामुळे पूर परिस्थितीत पाणी सोडण्यास सोयिस्कर होईल. धोबी घाटातील कॉंक्रीटीकरण काढण्यात येणार आहे, त्यामुळे पाण्याला होणारा अडथळा दूर होऊन पूर परिस्थितीत पाणी अडणार नाही आणि पुढे वाहून जाण्यात मदत होईल. तसेच गोदा ब्युटीफिकेशनमध्ये गॅबियन वॉल असणार आहे पूर परिस्थितीत या वॉलचे नुकसान होणार नाही, आणि पुराचे पाणी अडून राहणार नाही अशी रचना असणार आहे, हेरीटेज वॉक असणार आहे, थीम पार्क असेल, गार्डन असणार आहे, ऑपन थिएटर येथे असेल, जेट्टी असेल, बसवण्यात येणार आहे. या आराखड्याला निरीनेही परवानगी दिली आहे. प्रोजेक्ट गोदाचा आराखडा

बनवतानाच पुराचा धोका लक्षात घेऊन आराखडा बनवण्यात आला. मात्र, गेल्या काही दिवसांपूर्वी येऊन गेलेल्या पुरानंतर आराखड्यातील काही बाबींवर काम सुरू असल्याचे यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. प्रकाश थविल यांनी सांगितले. पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सोलर, पब्लिक बायसिकल शेअरिंग, विद्युत शवदाहिनी, स्मार्ट स्ट्रीट लाईट या विषयी माहिती यावेळी देण्यात आली. सोलर प्रोजेक्ट सुरूवातीला महानगरपालिकेच्या मालकीच्या 15 इमारतींवर उभारण्यात येतोय. यामुळे वीजबिलात आणि विजेच्या वापरात मोठ्याप्रमाणात बचत होणार आहे. त्याचबरोबर पब्लिक बायसिकल शेअरिंगबाबतही माहिती देण्यात आली. आतापर्यंत पब्लिक बायसिकल शेअरिंगमध्ये 70 हजार 095 नाशिककरांनी नोंदणी केली आहे. तर, 1 लाख, 22 हजार 051 राईड्स नाशिककरांनी अनुभवल्या आहेत. त्याचबरोबर इंटिग्रेडेट कंट्रोल ॲण्ड कमांड सेंटरबाबत यावेळी माहिती देण्यात आली आहे. नाशिकमधील सीसीटीव्ही, स्मार्ट पार्किंग कशाप्रकारे काम करेल, आणि शहरातील पथदिवे, पाणी सिस्टीम या सर्व बाबी येथे नियंत्रीत करण्यात येणार आहेत. सिटी बस सर्व्हिसबाबतही पत्रकारांच्या शंकांचं यावेळी निरसन करण्यात आलं.

जनसंपर्क विभाग
नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी,
डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड.